# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

<u>मान्यताप्राप्त युनियन</u>

दि. ७ मार्च २०१८

## नाशिक येथिल अपोलो हॉस्पिटल ओएनजीसीच्या पॅनेलवर घेण्याबाबत

मित्रहो,

नाशिक आणि त्याच्या आसपासच्या परीसरात ओएनजीसीतील अधिकारी व कर्मचारी रहात असून, नाशिकमध्ये वैद्यकीय सोयीसाठी कोणतेही हॉस्पिटल ओएनजीसीच्या पॅनेलवर उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्यासह त्यांच्या कुटूंबांचीही अत्यंत गैरसोय होत आहे. हि गैरसोय दूर करण्याकरीता ओएनजीसी कर्मचाऱ्यांनी नाशिक येथिल वॉकार्ड व अपोलो हॉस्पिटल पॅनेलवर घेण्याकरीता सह्यांची मोहिम राबवून ती कर्मचारी संघटनेला सादर केली. सदर सह्यांचे निवेदन तसेच दोन्ही हॉस्पिटल्सचे प्रस्ताव व युनियनचे मागणी पत्र कर्मचारी संघटनेने दि. १७/११/२०१४ रोजी (पत्र क्र. ONGC/KS/151/14) व दि. २८/७/२०१६ रोजी (पत्र क्र. ONGC/KS/91/16) मेडिकल डिपार्टमेंटला सादर केले होते.

कर्मचारी संघटनेच्या मागणीनुसार ओएनजीसीचे मेडिकल ऑफिसर डॉ. नितिन अहिरे यांनी दोन्ही हॉस्पिटलला नाशिक येथे भेट देवून पहाणी केली व आपला अहवाल मेडिकल डिपार्टमेंटला सादर केला होता. यानंतर नियमाप्रमाणे HR, Finance व Medical यांच्या टीमने एकत्रितरीत्या सदर हॉस्पिटलला भेट देणे आवश्यक असते. या भेटीसाठी होत असलेला विलंब लक्षात घेता कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस मा. प्रदीप मयेकर यांनी ईडी - एचआरओ साहेबांना भेटून परिस्थितीचे गांभीर्य पटवून दिले. व टिममधील अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांना सर्व प्रकारचे सहाय्य देवून सदर भेट घडवून आणण्यात आली. या भेटीचा अंतिम अहवाल मेडिकल डिपार्टमेंटला सादर करण्यात आला.

मात्र पेपर पडताळणीच्या वेळी असे आढळले कि, दोन्ही हॉस्पिटलकडे 80 G म्हणजे Tax Exemption Certificate नाही. एका हॉस्पिटलकडे हे सर्टिफिकेटच नव्हते तर दुसऱ्या हॉस्पिटलकडे असलेल्या सर्टिफिकेटची मुदत संपलेली होती. सदर सर्टिफिकेट असल्याशिवाय कोणतेही हॉस्पिटल ओएनजीसी पॅनेलवर घेवू शकत नाही हा नियम आहे. त्यामुळे हे सर्टिफिकेट असल्याशिवाय पुढिल कारवाई शक्य होणार नव्हती. सदर सर्टिफिकेट लवकरात लवकर मिळावे यासाठी नाशिकमधील श्री. स्वप्नील बडगुजर, विकार शेख, कल्पेश पवार, अमोल विसपुते अशी बरीच मंडळी सतत या हॉस्पिटल्सच्या संपर्कात होती. या सततच्या पाठपुराव्याला यश येवून वरील दोन्ही हॉस्पिटल्सनी 80 G मिळवले. व या हॉस्पिटल्सच्या संपर्कात असलेल्या आपल्या मंडळींनी सदर सर्टिफिकेट्स कर्मचारी संघटनेच्या कार्यालयात आणून दिली.

वॉकार्ड हॉस्पिटलसाठी ओएनजीसीच्या टिमची यापूर्वीच व्हिजीट झालेली असून, 80 G सर्टिफिकेटही आता मिळाले असल्याने सदर हॉस्पिटल लवकरच ओएनजीसीच्या पॅनेलवर येणे अपेक्षीत आहे. परंतू दरम्यानच्या काळात नाशिकमधिल आपल्या कर्मचारी-अधिकाऱ्यांनी अपोलो हॉस्पिटलला पहिली पसंती देवून कर्मचारी संघटनेकडे अपोलोसाठी आग्रह धरला. ओएनजीसीच्या नियमाप्रमाणे दोन्ही हॉस्पिटल्समधील अंतर आठ किमी पेक्षा कमी असल्याने हि दोन्ही हॉस्पिटल्स पॅनेलवर येणे सध्याच्या नियमाप्रमाणे अशक्य असल्याने अपोलो हॉस्पिटलच पॅनेलवर घेण्यासाठी सर्वांचा आग्रह आहे. नाशिककरांच्या या मागणीनुसार दि. 5/3/2018 रोजी कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस श्री. प्रदीप मयेकर यांनी मेडिकल इंचार्ज मा. डॉ. हँडिक साहेब यांच्यासोबत मिटींग घेवून चर्चा केली, त्यांना सर्व कल्पना दिली व त्यांनीही अपोलो हॉस्पिटलने सर्व गोष्टींची पूर्तता केल्यास अपोलो हॉस्पिटल ओएनजीसीच्या पॅनेलवर घेवू असे आश्वासन कर्मचारी संघटनेस दिले आहे. सर्व नाशिककरांच्या प्रयत्नास अशा प्रकारे कर्मचारी संघटनेच्या पाठिंब्यामुळे निश्चित यश लाभेलच. कर्मचारी संघटनेस खात्री आहे कि, लौकरच अपोलो हॉस्पिटल ओएनजीसीच्या पॅनेलवर येवून नाशिककर कर्मचाऱ्यांची व त्यांच्या कुटूंबीयांची गैरसोय दूर होईल.

- प्रकाश दळवी, अध्यक्ष